अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र.२५/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ५५४३ दि. ७८/१०/२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/२५/२०१९

श्री अनिरुद्ध पुरुषोत्तम सहस्रबुद्धे
flat no. अ/३०४ श्री बळीवंत निवास
१८४७ सदाशिव पेठ
पुणे -४११०३०

------------------ अपिलार्थी

विरुद्ध

१) जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका
२) जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

**श्री अनिरुद्ध पुरुषोत्तम सहस्रबुद्धे** रा. **flat no. अ/३०४ श्री बळीवंत निवास, १८४७ सदाशिव पेठ** पुणे -४११०३० (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी, महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. १३.०८.२०१९ रोजी अर्ज करून माहिती अधिकारात माहिती मागितलेली होती.

जन माहिती अधिकारी, महापालिका आयुक्त कार्यालय यांनी जा क्र.६७५०,दि.१३/०८/२०१९ रोजी जन माहिती अधिकारी, मा. उप आयुक्त (सामान्य प्रशासन ) यांचेकडे वर्ग केले आहे.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/मा.अधि/३९३१,दि.२३/०८/२०१९ अन्वये कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाकडे अर्ज वर्ग केला आहे. व जन माहिती अधिकारी, उप

आयुक्त (सामान्य प्रशासन ) यांचेकडील माहिती अपिलार्थी यांना जा.क्र .जमाअ /आस्था /४१७९, दि.३१/०८/२०१९ ने उत्तर दिले आहे.

जन माहिती अधिकारी तथा, अधिक्षक कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांना दि.०८/०५/२०१८, १७/०५/२०१८, २४/०७/२०१८, ०३/०९/२०१९ व दि.१९/०९/२०१९ रोजी विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयामार्फत अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई करण्यात आलेली आहे, असे उत्तर जा.क्र.५३५८, २०/०९/२०१९ ने देण्यात आलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| १३.०८.२०१९ | १३.०८.२०१९ | १२.०९.२०१९ | २०.०९.२०१९ | ८ दिवस |

अपिलार्थी यांचे जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय पुणे महानगरपालिका यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी अपील क्र. २५/२०१९ चा अपील अर्ज दि. ०१.१०.२०१९ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०१.१०.२०१९ | ०१.१०.२०१९ | १९.१०.२०१९ | आहे | -- |

सदर प्रकरणी दि.१०.१०.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी **श्री अनिरुद्ध पुरुषोत्तम सहस्त्रबुद्धे , रा. flat no. अ/३०४ श्री बळीवंत निवास ,१८४७ सदाशिव पेठ पुणे -४११०३० .हे उपस्थित होते. श्री.चेतन कबाडे,** जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपलिका व श्रीमती दीपा नंदगिरीकर, **जन माहिती अधिकारी तथा** , कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

**विवेचन**

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/मा. अधि/ ३९३१,दि.२३/०८/२०१९ अन्वये कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाकडे अर्ज वर्ग केला आहे.

जन माहिती अधिकारी तथा, अधिक्षक कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांना दि.०८/०५/२०१८, १७/०५/२०१८, २४/०७/२०१८,

०३/०९/२०१९ व दि.१९/०९/२०१९ रोजी विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयामार्फत अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई करण्यात आलेली आहे, असे उत्तर जा.क्र.५३५८, २०/०९/२०१९ ने देण्यात आलेले आहे, असे प्रतिपादन केले आहे.तथापि आजही जागेवर तशीच परिस्थिती असल्याचे अपिलकर्त्याने संगितले.

## आदेश

अपिलार्थी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी तथा कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय यांनी त्यांच्या मूळ अर्जातील तक्रार/माहिती विषयी उचित कार्यवाही करून कळविण्यात यावे. सबब सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(अनिल मुळे)**
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका